# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** देवणी **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0048 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/02/2021 00:21 बजे

2.

| **S.No. (अ.क्र.)** | **Acts (अधिनियम)** | **Sections (कलम)** |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | २०१ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 17/02/2021
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/02/2021
**Time From (वेळेपासून):** 19:14 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 19:14 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 17/02/2021 **Time (वेळ):** 23:57 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 044 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/02/2021 23:57 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 0.5 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लासोना चौक ,देवणी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अनिल बस्वराज बिरादार

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.(अ.** | **Id Type (ओळखपत्राचा प्रकार)** | **Id Number (ओळखपत्राचा क्रमांक)** |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वडमुरंबी ,देवणी ,देवणी,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | वडमुरंबी ,देवणी ,देवणी,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9049751775

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इद्रीस हानुमिय बागवान | | | 1. पोलीस ठाणे देवणी ,देवणी ,देवणी, लातूर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

13.Action **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** CHITAMBAR Shankarrao KAMTHEWAD(Inspector)) / POBN84808 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन देवणी जि.लातूर

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): CHITAMBAR Shankarrao
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN84808

फिर्याद दिनांक १७/०२/२०२१

मी अनिल बस्वराज बिरादार वय ३४ वर्षे, व्यवसाय शेती रा. वडमुरंबी ता. देवणी जि. लातूर मो.नं. ९०४९७५१७७५ समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करतो. मी दिनांक १६/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर कार्यालयात जावुन पोलीस निरीक्षक दराडे साहेब यांची भेट घेवु माझी एका लोकसेवका विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगुन त्यांना दिनांक १७/०२/२०२१ रोजी देवणी पासुन थोडया अंतरावर नागराळ कोनाळी मोडवर थांबतो तुम्ही या असे सांगुन माझे काम असल्याने मी लगेच परत आलो होतो.

आज दिनांक १७/०२/२०२१ रोजी सकाळी १०.०० वा. देवणी पासुन थोडया अंतरावर नागराळ कोनाळी मोडवर थांबलो असताना माझे जवळ येवुन खाजगी वाहनातुन उतरुन पोलीस निरीक्षक दराडे यांनी सापळा पथकातील सदस्य व पंचाची ओळख करून दिली. व पंचा करवी माझे नांव गांव विचारले असता मी त्यांना माझे नांव वरील प्रमाणे सांगुन मी दिनांक ०२/०२/२०२१ रोजी पोलीस निरीक्षक पोस्टे देवणी यांना दिलेला तक्रारी अर्ज त्यांच्याकडे सादर करुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली ती खालील प्रमाणे.

"आमचे मौजे वडमुरंबी शिवारात जमीन सर्व्हे नंबर १६ मध्ये शेती असुन शेतीकडे जाण्याचा वहिवाटा रस्त्याने जाण्यास धनराज मनोहर बिरादार व हावगीराव महादेव बिरादार व त्यांच्या मुलानी अडथळ करत असल्याने आम्ही गेल्या वर्षी मा. तहसीलदार साहेब यांना अर्ज केला असता मा. तहसीलदार देवणी यांनी आमच्या सारखा निकाल देवुन सामाईक बाधावरुन गाडी रस्ता वापर करण्याचा आदेश दिलेला आहे. तरी परंतू आम्ही सदर रस्त्याने जाताना धनराज मनोहर बिरादार व हावगीराव महादेव बिरादार व त्यांच्या मुलानी अडथळ करुन रस्त्याने जावुन देत नाही म्हणुन शिवीगाळ करुन अंगावर मारण्यास येवुन धमकी दिल्याने माझ्या वडीलांनी दिनांक ०२/०२/२०२१ रोजी पोलीस स्टेशन देवणी येथे जावुन धनराज मनोहर बिरादार व हावगीराव महादेव बिरादार यांचे विरुध्दात तक्रारी अर्ज दिलेला आहे. पण आज पर्यंत काहींच कार्यवाही करण्यात आली नसल्याने मी दोन दिवसा पुर्वी पोलीस स्टेशन देवणी येथें जावुन संबंधीत पोलीस बागवान यांना भेटुन माझ्या वडीलांनी धनराज मनोहर बिरादार यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारी अर्जात काय कारवाई केली या बाबत विचारणा केली असता संबंधीत पोलीस बागवान यांनी मला तुम्ही दिलेल्या तक्रारी अर्जात मदत करुन संबंधीतावर कारवाई करावयची असल्यास तुम्ही मला काही तरी दक्षणा दयावा लागेल कामे फुकट होत नाहीत म्हणुन माझेकडे लाच मिळवण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझे वर नमुद कामासाठी मला संबंधीत पोलीस बागवान यांना कोणत्याही प्रकारची लाच देण्याची इच्छा नाही. त्यांचा व माझा कसलाही अर्थिक देण्याघेण्याचा व्यवहार किंवा त्यांच्याशी माझे पुर्व वैमनश्य नाही. तरी संबंधीत पोलीस बागवान यांनी माझे वर नमुद कामासाठी लाचेची मागणी करुन ती स्वत: अथवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी." अशा आशयाची लेखी तक्रार दिली. सोबत दिनांक ०२/०२/२०२१ रोजी पोलीस स्टेशन देवणी येथे दिलेला तक्रारी अर्ज दिला. मी दिलेली तक्रार ही पोलीस निरीक्षक दराडे साहेब व पंचानी वाचुन पाहुन तक्रार व तक्रारी अर्जावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

पोलीस निरीक्षक दराडे यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस बागवान यांनी मला माझ्या वर नमुद कामासाठी लाचेची मागणी केली आहे. अगर कसे ? याची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन व ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन त्यामध्ये नविन कोरे मेमरी कार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस निरीक्षक दराडे यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरविले व सापळा कार्यवाही बाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना देवुन पोकॉ कच्छवे यांना देवणी जवळ जावुन डिजीट व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देण्याबाबत सांगितले.

त्याप्रमाणे मी व पंच कमांक १ तसेच पोकॉ कच्छवें असे माझेकडील मोटार सायकलवर देवणी लगत असलेल्या महादेवी मंदीराजवळ येवुन तेथुन पोकॉ कच्छवे यांनी १२.१८ वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटन चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच कमांक १ पाडदे असे माझ्याकडील मोटार सायकलवर पोलीस स्टेशन देवणी येथे जावुन गाडी उभी करुन आम्ही दोघे पोलीस स्टेशन देवणी मध्ये जावुन त्यांची पंचासमक्ष भेट घेवुन मी वडीलांनी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने चर्चा केली असता, पोलीस बागवान म्हणाले की, धनराज बिरादार ला १०७ ची प्रतिबंधक कार्यवाही मी केलाव,.. आती ती राहिल हावगीराव.....येना गेलय...त्यावर मी त्यांना म्हणालो की, थोड लवकर काय ते तेवढ करा साहेब त्यावा पोलीस बागवान म्हणाले की, चला चहा घेवुन म्हणुन आमच्या सोबत पोलीस स्टेशन समोरील चहाच्या हॉटेलमध्ये आले त्यावर मी त्यांना दक्षणा म्हणालो तो की, त्यावर पोलीस बागवान म्हणाले की, काय आहे ते तुमच्या मनाने दया...त्यावर मी त्यांना तुम्ही सांगा किती दयायचे ते त्यावर पोलीस बागवान म्हणाले की, तुमच्या खुशीने दयायचे.... त्यावर मी त्यांना

४,०००/–रुपये देतो साहेब त्यावर पोलीस बागवारन म्हणाले की दया....त्यावर मी त्यांना थोडयावेळात घेवुन येते म्हणुन मी व पंच क्रमांक १ पडादे असे परत पोकॉ कच्छवे यांच्या जवळ आलो असता पोकॉ कच्छवे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद केले. तेथुन आम्ही खाजगी वाहनाजवळ आलो असता पोलीस निरीक्षक दराडे यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक १ पाडदे यांना लाचेच्या मागणीच्या अनुषंगाने माझ्यात व पोलीस बागवान यांच्यात काय बोलने झाले याबाबत विचारणा केली त्यावेळी पंच क्रमांक १ पाडदे यांनी मी वर नमुद केल्या प्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वानी पोलीस कर्मचारी कच्छवे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व पोलीस बागवान यांच्यात झालेले संभाषण ऐकुन ते पंच क्रमांक १ यांनी सांगितलेल्या हकीकती प्रमाणे असल्याचे खात्री करुन पोलीस बागवान यांनी माझ्या वर नमुद कामासाठी **'काही आहे ते दया तुमच्या म्हणाने....दया'** असे म्हणुन ४,०००/–रुपये लाचेची रक्कम घेण्याचे मान्य करुन आणुन देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. पोलीस बागवान यांचे विरुध्द लाचेची सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला पोलीस बागवान यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणे बाबत कळविले असता मी माझेकडील ५००/–रुपये दराच्या ०८ चलनी नोटा असे एकुण ४,०००/–रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेच्या नोटांना पोना शिंदे यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या शर्टच्या छातीवरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवले. लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या तोंडाचा मास्क डाव्या हाताने काढुन हातामध्ये घेणे बाबतचा सुनियोजीत ईशारा म्हणुन सांगण्यात आला. पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवही बाबत सुचना दिल्या. व मला पोलीस निरीक्षक दराडे यांनी मला पोलीस बागवान यांना फोन करुन लाचेची रक्कम कोठे घेवुन याबाबत विचारणास सांगितले असता मी पोलीस बागवान यांना फोन लावला असता पोलीस बागवान यांनी सांगितले की, ते बाहेर जात आहेत आल्यानंतर मला फोन करता असे सांगित्याल्याने आम्ही सर्वजन पोलीस बागवान यांच्या फोनची वाट पाहत थांबुन राहिलो. सायंकाळ पर्यंत पोलीस बागवान यांचा फोन आला नसल्याने सर्वानमुते पोलीस बागवान यांना फोन करण्याचे ठरवुन मी पोलीस बागवान फोन लंावुन लाचेची रक्कम कोठे घेवुन याबाबत विचारणा केली असता त्यांनी मला देवणी येथील लासोणा चौकात येण्यास सागितले. मी व पंच क्रमांक १ तसेच कर्मचारी माझाकडील मोटार सायकलवर तसेच सापळा पथकातील सदस्य खाजगी वाहनाने लासोणा चौकाजवळ येवुन तेथे वाहन उभे करुन तेथे पोलीस निरीक्षक दराडे यांनी पुढील सापळा कार्यवाही परत सुचना देवुन पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेमार्फतीने डिजीटल व्हाईस रेकॉर्डर १८.५८ वा. चालु करुन माझ्या गळयात आडकविले. मी व पंच क्रमांक १ पाडदे असे लासोणा चौकाकडे गेलो. व सापळा पथकातील सदस्य व पंच क्रमांक २ खेर असे खाजगी वाहनातुन उतरुन आमच्या पाठीमागे येत असल्याचे दिसले. मी व पंच क्रमांक १ असे लासोणा चौकात रोडलगत मोटार सायकल जवळ थांबलेल्या पोलीस बागवान यांचे जवळ जावुन मी माझ्या कामाबाबत चर्चा करुन माझ्याकडील ४,०००/–रुपये अॅन्थ्रासीन पावडरयुक्त लाचेची रक्कम काढुन पोलीस बागवान यांनी दिली असता त्यांनी **'हं'**...म्हणुन सदर लाचेची रक्कम आपल्या उजव्या हाताने घेवुन त्यांच्या अंगातील वर्दीच्या शर्टच्या समोरील छातीवरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्याच वेळी मी नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. त्याचवेळी पोलीस निरीक्षक दराडे व पंच क्रमांक २ व सापळा पथकातील सदस्य सदर ठिकाणी समोरुन व पाठीमागुन येत असल्याचे पाहुन पोलीस बागवान हे त्यांच्या मोटार सायकल चालु करुन जात असताना पोलीस निरीक्षक दराडे यांनी गाडी थांबविण्यास सांगुन गाडी आडविण्याचा प्रयत्न केला असता पोलीस निरीक्षक दराडे यांना चालु गाडीने धक्का देवुन खालील पाडुन मोटार सायकलवर पळुन गेले. माझ्याकडील व्हाईस रेकॉर्डर पोलीस कर्मचारी कच्छवे यांचेकडे दिले. ते त्यांनी घेवुन बंद केले. पोलीस निरीक्षक दराडे खालील पडल्याने जखम झाली असल्याने पोलीस उपअधीक्षक बेद्रे व आम्ही सापळा पथकातील सदस्य खाजगी वाहनात बसुन पोलीस निरीक्षक दराडे यांना औषधउपचार करीता सरकारी दवाखाना देवणी येथे घेवुन जात असताना पुढे बोरोळ चौकात मोठया प्रमाणात गर्दी जमा झालेली होती. सदर ठिकाणी जखमी आवस्थेतील एक इसम व पोलीस बागवान रस्त्यात गाडीसह पडलेले होते. आम्ही सर्वजन सरकारी दवाखान देवणी येथे गेलो असता काही वेळाने लोकांनी पोलीस बागवान व जखमी इसम यांना पोलीसासह सरकारी दवाखाण्यात घेवुन आले. त्यानंतर वैद्यकिय अधिकारी यांनी जखमी खाजगी इसम व पोलीस बागवान यांना प्रथम औषध उपचार केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक दराडे यांना औषध उपचार केले. सरकारी दवाखाना देवणी येथील रुम नंबर १० मध्ये पोलीस निरीक्षक दराडे यांनी पंच क्रमांक १ यांना लाचेची रक्कम कोणी मागणी करुन कोण स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक १ यांनी जखमी आवस्थेत तेथे हजर असलेल्या खाकी वर्दीतील इसम हे पोलीस बागवान असुन तक्रारदार यांच्याकडे लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारुन आपल्या अंगातील वर्दीच्या शर्टच्या उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगुन मी वर नमुद प्रमाणे सांगितलेलले हकीकती प्रमाणे सांगितले. त्यावेळी पोलीस

निरीक्षक दराडे यांनी त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव इद्रीस हानुमियाँ बागवान वय ५२ वर्षे, पद सहायक पोलीस उप निरीक्षक, वर्ग–३, नेमणुक पोलीस स्टेशन देवणी रा. हिंदुस्ताना कॉलनी उदगीर असे असल्याचे सांगितले. पोलीस निरीक्षक दराडे यांनी माझे व पंचासमक्ष पोलीस बागवान यांना लाचेची रक्कम कोठे ठेवली याबाबत विचारणा केली असता त्यांनी काही एक न सांगता नकार दिलेला आहे. सदर ठिकाणी पंचामार्फत पोलीस बागवान यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे लाचेची रक्कम किंवा इतर वस्तु मिळुन आली नाही. त्यांनतर पोलीस निरीक्षक दराडे यांनी सदर रुममधील लाईट बंद करुन पोलीस बागवान यांच्या दोन्ही हाताची व वर्दीच्या शर्टच्या दोन्ही खिशाची आल्ट्राव्हाईलेट लॅम्पखाली पाहणी केली असता पोलीस बागवान यांच्या उजव्या हाताच्या बोटाच्या पे–यास व तळहातावर तसेच वर्दीच्या शर्टच्या छातीवरील उजव्या बाजुच्या खिशाच्या कडेवर व आतील बाजुस अँन्थ्रासीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आली. त्यानंतर पोलीस निरीक्षक दराडे यांनी पोलीस बागवान जखमी असल्याने त्यांना औषध उपचार करणे आवश्यक असल्याने सात दिवसात आत पुढील तपास कामी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय लातूर येथे हजर राहण्याची लेखी नोटीस देवुन त्यावर त्यांची व त्यांच्या मुलाची पंचासमक्ष सही घेवुन मुलगा नामे अन्सार इद्रीस बागवान यांच्या ताब्यात पोलीस निरीक्षक कामटेवाड पोलीस स्टेशन देवणी यांच्या समक्ष ताब्यात देण्यात आले. त्यांनतर पुढील कार्यवाही ही पोलीस स्टेशन देवणी येथे येवुन पुर्ण केली.

**तरी यातील लोकसेवक इद्रीस हानुमियाँ बागवान वय ५२ वर्षे, पद सहायक पोलीस उप निरीक्षक, वर्ग–३, नेमणुक पोलीस स्टेशन देवणी रा. हिंदुस्ताना कॉलनी उदगीर यांनी आज दिनांक १७/०२/२०२१ रोजी पोलीस स्टेशन देवणी येथे पंचासमक्ष माझ्या वडीलांनी दिनांक ०२/०२/२०२१ रोजी पोलीस स्टेशन देवणी येथे धनराज मनोहर बिरादार व हावगीराव महादेव बिरादार यांचे विरुध्दात शेती रस्त्याच्या कारणावरुन झालेल्या भांडण्याच्या अनुषंगाने दिलेल्या तकारी अर्जात संबंधीतावर कारवाई करुन मदत करतो म्हणुन ४,०००/–रुपये लाचेची मागणी रक्कम घेण्याचे मान्य करुन सदर लाचेची रक्कम १९.१४ वाजता देवणी येथील लासोणा चौकामध्ये स्वत: स्विकारुन सापळा पथकातील सदस्य समोर येत असल्यचे पाहुन पोलीस निरीक्षक दराडे यांना मोटार सायकलने धक्का देवुन पळुन जावुन लाचेची रक्कम कोठे तरी फेकुन दिलेली आहे. म्हणुन माझी त्यांच्या विरुध्द कायदेशिर तकार आहे.**

मी वर नमुद प्रमाणे सांगितलेली तकारी पोना सुरवसे यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन त्यांची प्रींट काढल्यानंतर ती मी वाचुन पाहिली ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

Biradar
अनिल बस्वराज बिरादार

17/2/21
**कुमार भ. दराडे**
**पोलीस निरीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर**